StudySite.org

A

लिपिक-टंकलेखक परीक्षा-2006
दि.20.5.2006

CODE : ADT

प्रश्नपुस्तिका क्रमांक
BOOKLET NO. 127377

प्रश्नपुस्तिका

मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान, बुद्धिमापन चाचणी व अंकगणित

वेळ : 2 (दोन) तास

एकूण प्रश्न : 200
एकूण गुण : 400

सूचना

1) सदर प्रश्नपुस्तिकेत 200 अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करुन घ्यावी. तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

2) आपला परीक्षा क्रमांक या चौकोनात न विसरता काळ्या शाईच्या बॉलपेनने लिहावा.

परीक्षा - क्रमांक [ ][ ][ ][ ][ ][ ][ ][ ]
केंद्रांची संकेताक्षरे — शेवटचा अंक

3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

4) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना (1), (2), (3) आणि (4) असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करुन दर्शविला जाईल, याची काळजी घ्यावी. **याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे. पेन्सील वा शाईचे पेन वापरु नये.**

5) **सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत,** घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे. पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ वाया न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे.** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

6) प्रश्नपुस्तिकेमध्ये विहित केलेल्या विशिष्ट जागीच कच्चे काम (रफ वर्क) करावे. प्रश्नपुस्तिकेव्यतिरिक्त उत्तरपत्रिकेवर वा इतर कागदावर कच्चे काम केल्यास ते कॉपी करण्याच्या उद्देशाने केले आहे, असे मानले जाईल व याबाबत योग्य ती कारवाई करण्यात येईल.

7) सदर प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपल्यानंतर उमेदवाराला ही प्रश्नपुस्तिका स्वत:बरोबर परीक्षाकक्षाबाहेर घेऊन जाण्यास परवानगी आहे. **मात्र परीक्षा कक्षाबाहेर जाण्यापूर्वी उमेदवाराने आपल्या उत्तरपत्रिकेचा भाग - 1 समवेक्षकाला न विसरता परत करणे आवश्यक आहे.**

SEAL

नमुना प्रश्न

प्र. क्र. 201 ''अंगावर काटा उभा रहाणे'' या वाक्यप्रचाराचा अर्थ काय ?

(1) अंग शहारणे (2) रोमांचित होणे
(3) अतिशय भिती वाटणे (4) बहरून येणे

या प्रश्नाचे योग्य उत्तर "(3) अतिशय भिती वाटणे" असे आहे. त्यामुळे प्रश्नाचे उत्तर "(3)" होईल. यास्तव **खालीलप्रमाणे** प्र.क्र. 201 समोरील उत्तर क्रमांक "③" हे वर्तुळ छायांकित करुन दाखविणे आवश्यक आहे.

प्र. क्र. 201. ① ② ● ④

अशा पद्धतीने प्रस्तुत प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नांचा तुमचा उत्तरक्रमांक हा तुम्हाला स्वतंत्ररित्या पुरविलेल्या उत्तरपत्रिकेवरील त्या त्या प्रश्नक्रमांकासमोरील संबंधित वर्तुळ पूर्णपणे छायांकित करुन दाखवावा.

ताकीद

(1) या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत / प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणत्याही स्वरुपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिद्ध करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर महाराष्ट्र प्रिव्हेंशन ऑफ मालप्रॅक्टीसेस ॲट युनिव्हर्सिटी, बोर्ड ॲन्ड अदर एक्झामिनेशन्स ॲक्ट - 1982 मधील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल.

(2) या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीय वृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरुद्ध उक्त कायद्यानुसार कारवाई करण्यात येईल.

समवेक्षकाच्या सूचनेशिवाय हे पृष्ठ उलटू नये

StudySite.org StudySite.org StudySite.org StudySite.org

StudySite.org StudySite.org

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

StudySite.org

StudySite.org StudySite.org

StudySite.org StudySite.org

1. पुढे दिलेल्या शब्दांतील शुद्ध शब्द कोणता?
   (1) वातानुकुलीत (2) वातानुकूलीत (3) वातानुकूलित (4) वातानूकुलित

2. खालील पैकी कोणत्या विभक्तीला 'चा' प्रत्यय येतो?
   (1) प्रथमा (2) तृतीया (3) द्वितीया (4) षष्ठी

3. कमतरता, कणकण, वाळवी असे अनेकार्थ व्यक्त करणारा शब्द ओळखा.
   (1) कसर (2) कळ (3) कचर (4) कढ

4. ''विस्थापितांना पुन्हा वसविणे'' या शब्द समुहाबद्दल एक शब्द कोणता?
   (1) स्थापना (2) पुनरपि (3) पुनर्वसन (4) पुन:स्थापना

5. 'ही वही माझी आहे', विशेषण ओळखा.
   (1) संबंधी विशेषण (2) प्रश्नार्थक विशेषण
   (3) दर्शक विशेषण (4) सार्वनामिक विशेषण

6. ''परीक्षेत नापास झालास की मार बसलाच म्हणून समज'' - या वाक्यातील काळ ओळखा.
   (1) अपूर्ण भविष्यकाळ (2) पूर्ण भविष्यकाळ
   (3) अपूर्ण वर्तमानकाळ (4) पूर्ण वर्तमानकाळ

7. पुढील पैकी कोणते वृत्त हे मात्रावृत्त आहे?
   (1) पादाकुलक (2) मालिनी (3) शिखरिणी (4) मंदाक्रांता

8. पुढील वाक्यातील गाळलेल्या जागी योग्य शब्द भरा.
   ''दोन वर्ण एकापुढे आले असता उच्चारशास्त्राच्या नियमाप्रमाणें ते एकच होण्याच्या प्रकाराला _____ असे म्हणतात.''
   (1) स्वरसंधी (2) व्यंजनसंधी (3) संधी (4) समास

P.T.O.

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

StudySite.org StudySite.org

StudySite.org StudySite.org

9. खालील पैकी कोणता शब्द पोर्तुगीज भाषेतून मराठीत रूढ झाला आहे?
(1) पेशवा (2) पाव (3) पावडर (4) पाकीट

10. 'वारा सुटला आणि पाऊस गेला'
या वाक्याचा प्रकार कोणता?
(1) केवल वाक्य (2) संयुक्त वाक्य (3) मिश्र वाक्य (4) साधारण वाक्य

11. 'हात पाय हालविणे' या वाक् प्रचाराचा नेमका अर्थ काय?
(1) व्यायाम करणे (2) पोहणे (3) प्रयत्न करणे (4) पळून जाणे

12. 'मुंगी होऊन साखर खावी'
वाक्प्रचाराचा अर्थ सांगा.
(1) मुंग्यांना साखर द्यावी (2) मुंग्यासारखे वागावे
(3) साखर मुंग्या खातात (4) विनयशीलपणाने चांगल्या गोष्टी होतात

13. खाली दिलेल्या वाक्यातील मिश्रवाक्य कोणते ते ओळखा.
(1) तानाजी शत्रूशी लढता लढता रणांगणातच मेला.
(2) आकाशात जेव्हा ढग जमतात, तेव्हा मोर नाचू लागतो.
(3) मुलानी वडिलांची आज्ञा पाळावी.
(4) अबब! केवढी प्रचंड गर्दी ही!

14. इच्छिलेली वस्तू देणारे झाड.
(1) कामधेनू (2) वटवृक्ष (3) चिंतामणी (4) कल्पवृक्ष

15. 'बायको' या शब्दाला समानार्थी शब्द कोणता?
(1) नारी (2) ललना (3) दारा (4) अबला

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

StudySite.org StudySite.org

StudySite.org StudySite.org

16. रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडा.
''वाक्यार्थाला बाध न आणता रचनेत केलेला बदल म्हणजे _____ होय.''
(1) संकेतबोधक (2) वाक्यरूपांतर (3) संयुक्त वाक्य (4) विधेय

17. 'बेकायदेशीर' या शब्दाचा अर्थ सांगा.
(1) लवाद (2) वैध (3) अवैध (4) संविधानिक

18. प्रयोगाचे मुख्य प्रकार किती?
(1) चार (2) तीन (3) दोन (4) पाच

19. पुढील पैकी कोणता शब्द 'सामान्यनाम' आहे?
(1) दांडगाई (2) आग्यावेताळ (3) अरवली (4) आमराई

20. 'महायुद्ध' या सामासिक शब्दात कोणता समास आहे?
(1) बहुव्रीही (2) कर्मधारय (3) अव्ययीभाव (4) द्वंद्व

21. 'त्याला गायला आवडते' प्रयोग ओळखा.
(1) कर्तरी (2) कर्मणी (3) कतुकर्मणी (4) भावे

22. रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.
''मराठी भाषा मुख्यत: _____ लिपीत लिहिली जाते.
(1) मोडी (2) बाळबोध (3) देवनागरी (4) नागरी

23. पुढील पैकी कोणत्या वाक्यात प्रयोजक क्रियापद योजिले आहे?
(1) मी सिनेमा पाहत नाही. (2) रमेश जात नाही.
(3) मला खेळवते. (4) कृष्णाने भीमाकडून जरासंधास मारविले.

P.T.O.

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

StudySite.org StudySite.org

StudySite.org StudySite.org

24. 'धातुसाधित' यास दुसरे नांव कोणते?
(1) शुद्ध शब्द योगी (2) शब्द सिद्धी (3) उभयविध धातू (4) कृदंत

25. पुढील वाक्यातील 'अव्यय' ओळखा.
''तुला शिकवावे म्हणून मी येथे आलो आहे.''
(1) आलो (2) म्हणून (3) येथे (4) शिकवावे

26. अधोरेखित शब्दाची जात ओळखा.
काळी गाय पांढरे दूध देते.
(1) नाम (2) सर्वनाम (3) विशेषण (4) क्रियापद

27. 'दोनदा जन्म घेतलेला' या शब्दसमूहा बद्दल एक शब्द कोणता?
(1) जन्मदा (2) त्रिज (3) बिज (4) द्विज

28. ''पैरण'' या शब्दाचा अर्थ सांगा.
(1) चपला (2) गुरांचा चारा
(3) सैल सदरा (4) बैलांना हाकलण्याची काठी

29. पुढील पैकी कोणता वर्ण महाप्राण आहे?
(1) क (2) ष (3) ह (4) ळ

30. जिथे नाणी तयार 'केली' जातात ती जागा कोणती? योग्य पर्याय निवडा.
(1) टाकसाळ (2) नाणेसाळ (3) नाणेखाना (4) नाणेघाट

31. पुढील पैकी कोणते अव्यय उभयान्वयी अव्यय आहे?
(1) अथवा (2) देखील (3) पुढे (4) बद्दल

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

StudySite.org StudySite.org

StudySite.org StudySite.org

32. योग्य शब्द भरा.
ज्याच्याविषयी वक्ता बोलतो त्यास _____ म्हणतात.
(1) विधेय (2) उद्देश्य (3) आज्ञार्थी (4) अनुकरण

33. खालील पैकी कोणता शब्द कानडी भाषेतून मराठीत रूढ झाला आहे?
(1) तंबाखू (2) किल्ली (3) दादर (4) हापूस

34. 'हंस' शब्दाचे स्त्रीलिंगी रूप कोणते?
(1) हंसाजी (2) हंसी (3) हंसाबाई (4) हौसाबाई

35. ''कोण आहे रे तिकडे'' या वाक्यापुढे कोणते चिन्ह येईल?
(1) उद्‌गार चिन्ह (2) स्वल्पविराम (3) पूर्णविराम (4) प्रश्नचिन्ह

36. खालील मिश्र वाक्याचे केवल वाक्य करा :
''आपण अपराधी आहोत हे त्याने कबूल केले.''
(1) आपण अपराधी असल्याचे त्याने कबूल केले. (2) अपराध केला म्हणून तो कबूल झाला.
(3) त्याने आपला अपराध कबूल केला. (4) तो अपराध करून कबूलही झाला.

37. ''खाई त्याला खवखवे'' या म्हणीशी अर्थाच्या दृष्टीने जास्तीत जास्त जुळणारी म्हण निवडा.
(1) चोराच्या मनात चांदणे (2) उथळ पाण्याला खळखळाट फार
(3) नाचता येईना अंगण वाकडे (4) करावे तसे भरावे

38. 'सौंदर्य' हे कोणते नाम आहे?
(1) विशेषनाम (2) सामान्यनाम (3) भाववाचक नाम (4) सर्वनाम

39. ''केलेले उपकार न जाणणारा'' – या शब्दसमूहाबद्दल एक शब्द कोणता?
(1) कृतज्ञ (2) अल्पसंतुष्ट (3) कृतघ्न (4) अजातशत्रू

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

StudySite.org StudySite.org

StudySite.org StudySite.org

40. 'पत्रकार' या पुल्लिंगी नामाचे स्त्रीलिंगी रूप सांगा.
(1) पत्रकर्ती (2) पत्रकरीण (3) पत्रकारिणी (4) पत्रकारी

41. खालील शब्दांपैकी शुद्धलेखनाच्या दृष्टीने योग्य शब्द ओळखा.
(1) कोट्यधीश (2) कोट्याधीश (3) कोटीधीस (4) कोट्यधीस

42. 'निरर्थक' चा विरूद्धार्थी शब्द.
(1) अर्थपूर्ण (2) अर्थशून्य (3) अर्थगर्भ (4) अर्थात

43. पूर्वी केलेले विधान अधिक स्पष्ट करावयाचे असेल तर _____ चिन्ह द्यावे.
(1) उद्‌गार (2) अपसारण (3) प्रश्न (4) विग्रह

44. 'भारतीय क्रिकेट संघाने विश्वचषक जिंकला' या वाक्यातील विधेय कोणते?
(1) विश्वचषक जिंकला (2) भारतीय क्रिकेट संघाने
(3) क्रिकेट संघाने (4) क्रिकेट संघाने विश्वचषक

45. पुढील वाक्याचा प्रकार कोणता ते सांगा.
''प्राणायाम शरीरप्रकृतीस हितावह आहे.''
(1) मिश्र वाक्य (2) केवल वाक्य (3) संयुक्त वाक्य (4) प्रधान वाक्य

46. ''ज्याच्या अंगी सामर्थ्य आहे तो इतरांवर अंमल गाजवतो''- या आशयासाठी पुढील कोणती म्हण योग्य आहे?
(1) पाचामुखी परमेश्वर (2) गाव करील ते राव काय करील
(3) दिव्या खाली अंधार (4) बळी तो कान पिळी

47. वाक्यात येणाऱ्या प्रत्येक शब्दाची व्याकरण विषयक संपूर्ण माहिती सांगणे यालाच _____ म्हणतात.
(1) शब्दजाती (2) नाम (3) पदपरिस्फोट (4) शब्दसिद्धी

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

StudySite.org StudySite.org

StudySite.org StudySite.org

48. ''समाजात विषमता असू नये''- या वाक्याचा पुढीलपैकी होकारार्थी पर्याय निवडा.

(1) समाजात समानता नसावी. (2) समाजात समानता असावी.

(3) समाजात विषमता आहे. (4) समाजात विषमता असावी.

---

49. 'बालमन' या सामासिक शब्दात कोणता समास आढळतो?

(1) कर्मधारय (2) द्विगु (3) द्वंद्व (4) तत्पुरुष

---

50. 'बादरायण संबंध असणे' चा योग्य अर्थ निवडा.

(1) घनिष्ठ मैत्री असणे (2) दुरान्वयाने संबध असणे

(3) ओढून ताणून संबंध लावणे (4) शत्रूत्व असणे

---

51. भारताने _____ हा पहिला उपग्रह अवकाशात सोडला.

(1) भास्कर (2) रोहिणी (3) ऑपल (4) आर्यभट्ट

---

52. सर्व साधारणपणे सागरजलाची क्षारता _____ असते.

(1) ३५ % (2) २५ % (3) ४० % (4) १०० %

---

53. राजाराम मोहन रॉय यांच्या प्रयत्नाने ब्रिटिश सरकारने सतीची चाल कायद्याने कोणत्या साली बंद केली?

(1) १८२७ (2) १८३१ (3) १८३० (4) १८२९

---

54. इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ कोणत्या शिक्षण प्रणालीशी संबंधीत आहे?

(1) स्त्री शिक्षण (2) दूर शिक्षण

(3) अपंगाचे शिक्षण (4) मागासवर्गीयांचे शिक्षण

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

StudySite.org StudySite.org

StudySite.org StudySite.org

55. रॉबर्ट क्लाईव्ह याने कोणत्या प्रांतात 'दुहेरी राज्य व्यवस्था' सुरू केली?
(1) बंगाल (2) पंजाब (3) मद्रास (4) मुंबई

56. मुलींसाठी पहिले वाचनालय सुरू करण्याचा मान कोणाकडे जातो?
(1) म. जोतिबा फुले (2) जगन्नाथ शंकरशेठ (3) धोंडो केशव कर्वे (4) न्या. रानडे

57. आपल्या संघराज्यात मंत्रिपरीषद आणि राष्ट्रपति यांच्यातील दुवा _____ असतो.
(1) उपराष्ट्रपती (2) पंतप्रधान (3) लोकसभा अध्यक्ष (4) उपपंतप्रधान

58. राजस्थानमधील अबुच्या पहाडात दिलवाडा येथे संगमरवरावरील कोरीव कामासाठी प्रसिद्ध मंदिरे _____ धर्माची आहेत.
(1) बौद्ध (2) जैन (3) हिन्दु (4) शीख

59. 'स्टिल किंग' म्हणून कोणास ओळखले जाते?
(1) रतन टाटा (2) अनिल अंबाणी (3) बिर्लाग्रुप (4) लक्ष्मी मित्तल

60. महाराष्ट्र पठारावरील आकाराने सर्वात लहान खोरे कोणते?
(1) तापी खोरे (2) प्राणहिता खोरे (3) कृष्णा खोरे (4) गोदावरी खोरे

61. नवऱ्याला देव मानण्यासाठी नवऱ्याचे वागणे खरोखर देवासारखे असले पाहिजे असे मत कोणाचे आहे?
(1) संत तुकाराम (2) संत गाडगेबाबा (3) म. जोतिबा फुले (4) न्या. रानडे

62. 'शुन्यलब्धी' चे लेखक कोण?
(1) लोकमान्य टिळक (2) न्या. रानडे (3) विष्णुबुवा ब्रम्हचारी (4) बाळशास्त्री जांभेकर

63. खेड्यातून महसूल गोळा करण्याचे काम कोणाकडून केले जाते?
(1) ग्रामसेवक (2) तलाठी (3) पोलिस पाटील (4) सरपंच

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

StudySite.org StudySite.org

StudySite.org StudySite.org

64. युनोचे प्रमुख कार्यालय कोठे आहे?
(1) हेग (2) पॅरिस (3) न्यूयॉर्क (4) मॉस्को

65. विल्यम शेक्सपियर हा _____ म्हणून प्रसिद्ध होता.
(1) कांदबरीकार (2) शिल्पकार (3) नाटककार (4) मुर्तीकार

66. वेलिंग्टन ट्रॉफी खालील पैकी कोणत्या खेळाशी संबंधित आहे?
(1) नौकानयन (2) फुटबॉल (3) हॉकी (4) क्रिकेट

67. भारतीय पठारावरील पश्चिम वाहिनी नदी कोणती आहे?
(1) महानदी (2) गोदावरी (3) नर्मदा (4) कावेरी

68. महाराष्ट्र शासनाने _____ यांच्या अध्यक्षतेखाली एक लोकशाही विकेंद्रीकरण समिती नेमली.
(1) सादिक अली (2) बलवंतराव मेहता (3) वसंतराव नाईक (4) पी.बी. पाटील

69. २००६ ची मिस इंडिया युनिव्हर्स :
(1) नेहा कपूर (2) नताशा सुरी (3) अमृता पत्की (4) तृणा चक्रवर्ती

70. पहिली पंचवार्षिक योजना केव्हा सुरू झाली?
(1) सन १९४८-४९ (2) सन १९५०-५१ (3) सन १९५१-५२ (4) सन १९५३-५४

71. एका वर्षात संसदेची कमीत कमी किती अधिवेशने घ्यावी लागतात?
(1) ४ (2) १ (3) ५ (4) २

72. महाराष्ट्रात ऊस संशोधन केंद्र कोठे आहे?
(1) पाडेगाव (2) लोणंद (3) शेखमिरेवाडी (4) भादे

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

StudySite.org StudySite.org

StudySite.org StudySite.org

73. २००६-२००७ चे रेल्वेचे अंदाज पत्रक लोकसभेत कोणी मांडले?
(1) श्री. पी. चिदम्बरम (2) श्री. लालू प्रसाद यादव
(3) श्री. मनमोहन सिंग (4) श्री. शरद पवार

74. सांगली जिल्ह्यात कोठे हातमाग कापड व्यवसाय सुरू आहे?
(1) कडेगाव (2) तासगाव (3) कवठे महांकाळ (4) विटा

75. लोकमान्य टिळक यांनी गणपती उत्सव सार्वजनिकरित्या साजरा करण्याची परंपरा केव्हा सुरु केली?
(1) सन १८९२ (2) सन १८९४ (3) सन १८९६ (4) सन १८९८

76. बारावी आशियायी परिषद (२००६) कोठे भरली होती?
(1) दिल्ली (2) सेबू (3) बँकॉक (4) हिरोसिमा

77. फ्रेंच टेनिस ओपन पुरूष एकेरी स्पर्धा (२००६) विजेता.
(1) रॉजर फेडरर (2) मार्कोस बाधडेटिस
(3) राफेड नडाल (4) महेश भूपती

78. फुप्फुस याचा कोणत्या संस्थेशी संबंध येतो?
(1) पचन संस्था (2) रक्ताभिसरण संस्था
(3) श्वसन संस्था (4) उत्सर्जन संस्था

79. पहिले वैयक्तीक सत्याग्रही म्हणून कोणाची निवड झाली?
(1) जवाहरलाल नेहरु (2) विनोबा भावे (3) सरदार पटेल (4) मौलाना आझाद

80. भारताची राजमुद्रा सारनाथ येथील अशोक स्तंभाच्या आधारे तयार करण्यात आली असल्याने सारनाथ येथील मूळ अशोक स्तंभावर किती सिंह कोरलेले आहेत?
(1) दोन (2) तीन (3) चार (4) पाच

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

StudySite.org StudySite.org

StudySite.org StudySite.org

81. सुर्यापासून येणारे _____ किरण सजीव सृष्टीला हानीकारक असतात.
(1) अल्फा किरण (2) बिटा किरण (3) अतिनील किरण (4) गामा किरण

82. कार्बनची दोन स्फटीकरूपे कोणती ?
(1) हिरा व ग्राफाइट (2) हिरा व कोक
(3) ग्राफाईट व कोक (4) कोक व लोणारी कोळसा

83. शिक्षक दिन कोणत्या दिवशी साजरा केला जातो ?
(1) १५ मे (2) २७ जून (3) ९ ऑगस्ट (4) ५ सप्टेंबर

84. 'द कोर्ट डान्सर' या पुस्तकाचे लेखक कोण ?
(1) रवींद्रनाथ टागोर (2) के.एम. मुन्शी (3) डॉ. राजेंद्र प्रसाद (4) डॉ. जाकिर हुसैन

85. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री कोण ?
(1) आर.आर. पाटील (2) विलासराव देशमुख
(3) गोपीनाथ मुंडे (4) रामदास कदम

86. तबला वादक कोण ?
(1) समता प्रसाद (2) छत्रपती सिंग (3) बालस्वामी दीक्षित (4) श्री कुमार शर्मा

87. खोडावर जेथे पाने फुटतात त्यास _____ म्हणतात.
(1) कांडे (2) पेरे (3) कोंब (4) कक्ष

88. ऑस्कर पुरस्कारासाठीचे नामांकन जाहिर झालेला चित्रपट.
(1) वानप्रस्थम् (2) घराबाहेर (3) वॉटर (4) द गोल

P.T.O.

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

StudySite.org StudySite.org

StudySite.org StudySite.org

89. 'गायडींग सोल्स' या पुस्तकाचे लेखक कोण?
(1) डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम (2) डॉ. अमर्त्य सेन
(3) कपिलदेव (4) सुश्मिता सेन

---

90. प्रियानंदा मोहंती यांचा कोणत्या नृत्याशी संबंध आहे?
(1) ओडिसी (2) मणिपूरी (3) कुचीपुडी (4) कथकली

---

91. खालील अक्षरे एकदाच वापरुन एक अर्थपूर्ण शब्द तयार केल्यास त्या शब्दातील 'च' आणि 'ता' ही दोन अक्षरे कोणत्या स्थानावर असतील?
कि रां ता पं त च
(1) एक व सहा (2) चार व पाच (3) दोन व तीन (4) पाच व सहा

---

92. पुढे संख्यांची एक श्रेणी दिली आहे ती विशिष्ट नियमानुसार आहे. तो नियम लक्षात घेऊन प्रश्नचिन्हाच्या जागी येणारी संख्या पर्यायामधून निवडा.
२, १०, २६, ५०, ?
(1) ८२ (2) ८३ (3) ८४ (4) ८५

---

93. खालीलपैकी कोणती एक संख्या इतर तीनपेक्षा वेगळी आहे?
(1) ४९ (2) २९ (3) १६ (4) २५

---

94. खालील आकृतीत एकूण त्रिकोण किती?



(1) चार (2) पाच (3) सात (4) आठ

---

95. प्रश्नचिन्हाजागी येणारा पर्याय शोधा.
A ३, C ६, E १२, G २४, ?
(1) H ४८ (2) I ४८ (3) J २७ (4) K २७

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

StudySite.org StudySite.org

StudySite.org StudySite.org

96. विजोड पद ओळखा.

४८, ५६, ७५, ८४

(1) ५६ (2) ७५ (3) ८४ (4) ४८

---

97. रोहनचा त्याच्या वर्गात खालून तसेच वरुन २८ वा क्रमांक लागतो तर त्याच्या वर्गात एकूण विद्यार्थी किती?

(1) ५२ (2) ५६ (3) ५५ (4) ५७

---

98. इंग्रजी वर्णमालेतील अक्षरांचा क्रम लक्षात घेता, पुढील अक्षरांच्या गटात प्रश्नचिन्हाच्या जागी येणाऱ्या वर्णाचा अचूक पर्याय निवडा.

अक्षरगट– Z, X, U, Q, ?, ?

(1) L F (2) Y G (3) Z X (4) Y W

---

99. प्रश्न चिन्हाच्या जागी येणारा योग्य पर्याय कोणता?

$\frac{५}{७} : \frac{२५}{३५} : : \frac{१२}{१७} : ?$

(1) $\frac{६०}{८५}$ (2) $\frac{७२}{१०२}$ (3) $\frac{५१}{६०}$ (4) $\frac{३६}{५१}$

---

100. खालील गटात न बसणारा शब्द कोणता?

तबला, संबळ, सनई, ढोल

(1) तबला (2) संबळ (3) सनई (4) ढोल

---

101. सुदेशच्या घरापासून पूर्वेस २ कि.मी. अंतरावर त्याच्या शिक्षिकेचे घर आहे. शिक्षिकेच्या घरापासून बरोबर दक्षिणेस १.५ कि.मी. अंतरावर शाळा आहे. तर शाळेपासून सुदेशचे घर किती कि.मी. अंतरावर असेल?

(1) ३.५ कि.मी. (2) ३ कि.मी. (3) २.५ कि.मी. (4) ४ कि.मी.

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

StudySite.org StudySite.org

StudySite.org StudySite.org

102. खालील प्रश्नात संख्यांचे तीन संच दिले आहेत. संचातील संख्येचा एकमेकाशी संबंध आहे. तो ओळखून प्रश्नचिन्हाच्या जागी येणाऱ्या संख्येचा पर्याय निवडा.

१२ (४२) ९

१७ (६४) १५

२९ (?) १६

(1) ९० (2) ४५ (3) ७४ (4) १३

---

103. पुढील दोन पदांमधील संबंध ओळखून प्रश्न चिन्हाच्या जागी येणारा पर्याय शोधा.

नदी : सरिता : : समुद्र : ?

(1) पाणी (2) मगर (3) रत्नाकर (4) मोती

---

104. ऑक्टोबर महिन्याच्या ३१ तारखेस रविवार येत असेल त्या महिन्यात एकूण किती रविवार येतील?

(1) चार (2) तीन (3) पाच (4) यापैकी नाही

---

105. सुरेश हा पूर्वेकडे ५ कि.मी. चालत गेला आणि त्यानंतर डावीकडे वळून तो ४ कि.मी. चालला. त्यानंतर पुन्हा डावीकडे वळून ५ कि.मी. चालला. त्यांनतर उजवीकडे वळून तो परत ५ कि.मी. चालला तर सुरेश निघालेल्या जागेच्या किती अंतरावर व कोणत्या दिशेस असेल?

(1) ९ कि.मी. उत्तर (2) ५ कि.मी. दक्षिण (3) ४ कि.मी. पूर्व (4) १ कि.मी. पश्चिम

---

106. खालील प्रश्नातील वर्तुळामधील व वर्तुळबाहेरील संख्येचा संबंध लक्षात घेऊन तिसऱ्या वर्तुळातील प्रश्नाचिन्हाच्याजागी असलेली संख्या निवडा.



(1) १४ (2) २८ (3) ४२ (4) २१

---

107. सुरेश गीताचा भाऊ, गीता लताची मावशी, लता पुष्पाची बहीण, तर सुरेश व पुष्पाचे नाते कोणते?

(1) काका-पुतणी (2) भाऊ-बहीण (3) मामा-भाची (4) आजोबा-नात

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

StudySite.org StudySite.org

StudySite.org StudySite.org

108. खालील संख्या संचाशी जास्तीत जास्त साम्य असणारा संच पर्यायांमधून निवडा.

संच : ४, १६, ३६

(1) ६४, १००, १४४ (2) ९, २५, ३६ (3) १, २५, ८१ (4) ४, २५, ६४

---

109. खालील अंकसूचीतील संबंध ओळखून प्रश्न चिन्हाच्या जागी असलेल्या संख्येसाठी योग्य पर्याय लिहा.

४, ९, १९, ३९, ?

(1) ४९ (2) ७८ (3) ६९ (4) ७९

---

110. प्रश्नचिन्हाच्या ठिकाणी **योग्य** क्रम लिहा?

८, २४, ४०, ५६, ?

(1) ७२ (2) ६४ (3) ९६ (4) यापैकी नाही

---

111. खालील संख्यामाला पूर्ण करा.

२, ३, ५, ८, १३, २१, ?

(1) ५२ (2) ३० (3) ३४ (4) ३२

---

112. एका विद्यार्थ्याने एका संख्येस ३ ने गुणण्या ऐवजी ३ ने भागले त्याचे उत्तर ३ आले तर बरोबर उत्तर कोणते यावयास हवे होते?

(1) २७ (2) ०९ (3) ८१ (4) १२

---

113. खालील गटात न बसणारी व्यक्ती कोण?

पंडित नेहरू, महात्मा गांधी, अटल बिहारी वाजपेयी, पी.व्ही. नरसिंहराव

(1) पंडित नेहरू (2) महात्मा गांधी

(3) अटल बिहारी वाजपेयी (4) पी.व्ही. नरसिंहराव

---

114. अंकिताचे घड्याळ दर तासाला १० सेकंद मागे पडते. अनुष्काचे घड्याळ एका दिवसात ३ मिनिटे पुढे जाते. अंकिता व अनुष्काने आपापली घड्याळे सकाळी १० वाजता बरोबर लावली. दुसऱ्या दिवशी सकाळी १० वाजता त्या दोघी भेटल्या तर त्यावेळी त्यांच्या घड्याळातील वेळेत किती फरक असेल?

(1) १० मिनिटे (2) ४ मिनिटे (3) ३ मिनिटे ३० सेकंद (4) ७ मिनिटे

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

StudySite.org StudySite.org

StudySite.org StudySite.org

115. खालील शब्दांमधील गटात न बसणारा शब्द ओळखा.

(1) पुनर्वसु (2) वर्षा (3) उत्तरा (4) आश्लेषा

116. पुढील पैकी पहिल्या दोन शब्दांमध्ये परस्पराशी एक विशिष्ट संबंध निगडीत आहे. तोच संबंध लक्षात घेऊन प्रश्नचिन्हाच्या जागी येणारा शब्द ओळखा.

MLCQP : POFTS : : BKGCR : ?

(1) ENJOR (2) ENJGK (3) ENJFU (4) ENJGR

117. पुढील शब्द मराठी शब्दकोशाप्रमाणे लावल्यास शेवटून दुसरा शब्द कोणता?

अनाथ, अनास्था, अनाडी, अनादि

(1) अनास्था (2) अनाडी (3) अनाथ (4) अनादि

118. खालील मालिकेत न बसणारे अक्षर कोणते?

F, E, D, G, B, A

(1) E (2) G (3) C (4) D

119. खालीलपैकी गटात न बसणारी संख्या ओळखा.

२३, ४७, ८०, ११९

(1) २३ (2) ११९ (3) ४७ (4) ८०

120. जर 'FRIDAY' हा शब्द एका सांकेतिक लिपीत 'COFAXV' असा लिहिला जातो; तर 'ORANGE' हा शब्द कसा लिहिला जाईल?

(1) OLXBAG (2) LOXIBA (3) LOXGAB (4) LOXKDB

121. आशुतोष उगवता सूर्य पाहतो व डावीकडे एकदा काटकोनात व उजवीकडे दोनदा काटकोनात वळतो तर त्याच्या पाठीमागची दिशा कोणती?

(1) उत्तर (2) दक्षिण (3) पश्चिम (4) पूर्व

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

StudySite.org StudySite.org

StudySite.org StudySite.org

122. रमेशजवळ उमेशच्या तिप्पट रुपये आहेत. दोघांचे मिळून २८ रुपये आहेत तर रमेशजवळ उमेशपेक्षा किती रुपये जास्त आहेत?

(1) ७ रु. (2) १४ रु. (3) १२ रु. (4) १० रु.

---

123. मिलिग्रॅम : सेंटीग्रॅम :: डेसिग्रॅम : ?

(1) ग्रॅम (2) डेकाग्रॅम (3) किलोग्रॅम (4) हेक्टग्रॅम

---

124. पुढीलपैकी सर्वात मोठा अपूर्णांक कोणता?

$\frac{१४}{१५}, \frac{१}{४}, \frac{२}{५}, \frac{१४}{१६}$

(1) $\frac{१४}{१५}$ (2) $\frac{१}{४}$ (3) $\frac{२}{५}$ (4) $\frac{१४}{१६}$

---

125. एक जानेवारी २००५ ला शनिवार होता तर ३१ डिसेंबर २००६ ला कोणता वार असेल?

(1) शनिवार (2) बुधवार (3) गुरूवार (4) रविवार

---

126. एका सांकेतिक भाषेत 'मगर' हा शब्द $\Delta \times \square$ असा लिहिला जातो तर $\times \Delta \square$ हा संकेत कोणत्या शब्दाचा आहे?

(1) गमर (2) गरम (3) मरग (4) यापैकी नाही

---

127. खालील संख्यातील संबंध ओळखून प्रश्न चिन्हाच्या जागी येणारी योग्य संख्या पर्यायांतून शोधा.

४ : २५ : : ५ : ?

(1) २० (2) ३६ (3) ३२ (4) १६

---

128. घड्याळाचे दोन्ही काटे एकमेकांत ९०° चा कोन दररोज किती वेळा करतात?

(1) १ (2) २ (3) ३ (4) ४

P.T.O.

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

StudySite.org StudySite.org

StudySite.org StudySite.org

129. प्रश्न चिन्हाच्या जागी येणारा योग्य पर्याय कोणता?

चैत्र, ज्येष्ठ, भाद्रपद, पौष, ?

(1) माघ (2) ज्येष्ठ (3) फाल्गुन (4) वैशाख

---

130. एका ठराविक प्रकारच्या गणित पद्धतीत जर ४ × ३ = १६, ६ × ४ = २८, ४ × २ = १२ असेल तर ९ × ५ = ?

(1) ४५ (2) ४७ (3) ४८ (4) ४९

---

131. रस्त्याच्या दोन्ही बाजूला समान अंतरावर झाडे लावायची आहेत. दोन झाडांमधील अंतर ३० मी. असल्यास ३ कि.मी. रस्त्यावर लावण्यासाठी किती रोपे लागतील?

(1) १०० (2) १०१ (3) २०० (4) २०२

---

132. एक रेडिओ ४८०० रु. स विकण्याने २५% तोटा होतो. तर रेडिओची मूळ किंमत किती?

(1) ८००० रु. (2) ६४०० रु. (3) ६००० रु. (4) २१०० रु.

---

133. मनीष १ डझन पेनस् प्रत्येकी ६.५० रु. दराने विकतो, ह्या व्यवहारात त्यास ३०% नफा होतो तर १ डझन पेनांची मूळ किमत किती?

(1) ६० रु. (2) ६५ रु. (3) ४८ रु. (4) ७२ रु.

---

134. मी ७.००२ कि.मी. प्रवास रेल्वेने, ४३.२३ कि.मी. प्रवास एस्.टी.ने व ५०० मीटर प्रवास पायी केला. तर मी एकूण किती कि.मी. प्रवास केला?

(1) ५०.५३२ (2) ५०.७३२ (3) ५५.०२५ (4) ५०

---

135. ५.७ ÷ ०.००१९ = किती?

(1) २००० (2) ७५०० (3) ६००० (4) ३०००

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

StudySite.org StudySite.org

StudySite.org StudySite.org

136. खालील पैकी कोणते विधान बरोबर आहे?

(1) $\frac{१०१}{१०००} > ०.११$ (2) $\frac{९}{१००} > ०.००९$

(3) $\frac{१३}{१००} < ०.०१३$ (4) $५.०४ < ५.००४$

---

137. एक रक्कम राम, लक्ष्मण, भरत ह्यांच्यामध्ये २ : ३ : ७ या प्रमाणात वाटल्यास राम व लक्ष्मण ह्यांना मिळून, भरतपेक्षा ३६०० रु. कमी मिळतात तर ती रक्कम कोणती?

(1) २२४०० रु. (2) २५००० रु. (3) २३८०० रु. (4) २१६०० रु.

---

138. रामदासने आपल्या शेताचा $\frac{१३}{२०}$ भाग विकला, म्हणजे त्याने किती टक्के शेत विकले?

(1) ५०% (2) ६५% (3) ३०% (4) १३%

---

139. एका समुहात १० माणसे आहेत. समुहातील प्रत्येक माणूस समुहातील प्रत्येकाशी एकदाच हस्तांदोलन करतो तर एकूण किती हस्तांदोलने होतील?

(1) १० (2) २०

(3) ४५ (4) यापैकी कोणतेही नही

---

140. $\sqrt{\frac{०.८२ + ३.४३ + ०.९५}{०.३७ + ०.७३ + ०.२०}}$ = किती?

(1) ०.२ (2) ४ (3) २ (4) ०.४

P.T.O.

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

StudySite.org StudySite.org

StudySite.org StudySite.org

141. एक मुलगा ताशी १५ कि.मी. वेगाने १५ मिनीटे धावतो, नतंर ताशी ५ कि.मी. वेगाने १५ मिनीटे चालतो तर पूर्ण प्रवासातील त्याचा सरासरी वेग किती ?

(1) ताशी १५ कि.मी. (2) ताशी १० कि.मी.

(3) ताशी १२ कि.मी. (4) यापैकी कोणतेही नाही

---

142. $\frac{२}{५}$ आणि $\frac{४}{९}$ ह्या दोन अपुर्णांकांच्या मध्ये खालील पैकी कोणता अपुर्णांक येतो ?

(1) $\frac{३}{७}$ (2) $\frac{२}{३}$ (3) $\frac{४}{५}$ (4) $\frac{१}{२}$

---

143. एका शहराची लोकसंख्या ६७८५३६९ आहे. त्यामधील श्रीमंतांची संख्या ७००२६९ आहे व गरिबांची संख्या ३५७२८६४ आहे. उरलेली मध्यम वर्गीयांची संख्या आहे. तर त्या शहरातील मध्यमवर्गीयांची संख्या किती ?

(1) ४२७३१२५ (2) २५१२२४४ (3) ६०२८३९४ (4) २०१२३४४

---

144. २३.४५ + ३२.१५ × २.४ − ७.३ = किती ?

(1) ९६.४२ (2) ९५.४७ (3) ९३.३१ (4) ९०.४२

---

145. शहराची लोकसंख्या प्रत्येक वर्षी तिप्पट होते. २००० या साली शहराची लोकसंख्या ७३०० होती. तर २००४ साली शहराची लोकसंख्या काय असेल ?

(1) ८७६०० (2) ४२०००० (3) ५४०००० (4) ५९१३००

---

146. एका मशिनची किंमत १०,००००० रु. आहे. त्या किंमतीत दर वर्षी १२% दराने घट होते. तर २ वर्षांनी मशिनची किंमत काय होइल ?

(1) ७,७०,००० रु. (2) ७,७४,४०० रु.

(3) ७,००,००० (4) यापैकी कोणतेही नाही

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

StudySite.org StudySite.org

StudySite.org StudySite.org

147. निखिलला शालान्त परीक्षेत गणिता खेरीज इतर सहा विषयात सरासरी ८२ गुण मिळाले. गणितासह सात विषयातील सरासरी गुण ८४ असल्यास गणितामध्ये त्याला किती गुण मिळाले ?

(1) ९६ (2) ९३ (3) ८६ (4) ९२

---

148. एका शाळेत गतवर्षी ४८० मुले होती. चालू वर्षी ५४० मुले आहेत. तर मुलांच्या संख्येत शेकडा वाढ किती झाली ?

(1) १२.५ (2) ३७.५ (3) २० (4) ४०

---

149. ०.४ × ०.०४ × ०.००४ = किती ?

(1) ०.००१६ (2) ०.००००६४ (3) ०.००००४ (4) ०.०१६०४४

---

150. ३.४ (२ x − ३) = १०.२ तर x ची किंमत किती ?

(1) २ (2) ३.२ (3) ३ (4) ६.२

---

151. खालील बेरीज करा :

५ तास ५५ मिनीटे + ४ तास + ४४ मिनीटे

(1) ९ तास ३९ मिनीटे (2) १० तास ९ मिनीटे

(3) १० तास १९ मिनीटे (4) १० तास ३९ मिनीटे

---

152. किती वर्षात १७५० रुपयावरील ९ द.सा.द.शे. दराने सरळव्याज, हे २२५० रुपयावरील १०.५ द.सा.द.शे. दराने ४ वर्षात होणाऱ्या सरळव्याजा इतके होईल ?

(1) ६ वर्षे (2) ६ वर्षे ३ महिने (3) ७ वर्षे ३ महिने (4) ५ वर्षे

---

153. सोडवा :

$$\frac{०.०२०३ \times २.९२}{०.०११६ \times १४.६ \times ०.७}$$

(1) ०.२ (2) ०.३ (3) ०.४ (4) ०.५

P.T.O.

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

StudySite.org StudySite.org

StudySite.org StudySite.org

154. सोडवा :

$$३ \times १०० + ३ \times \frac{१}{१००} + ३ \times १० + ३ \times \frac{१}{१०००} + ३ \times \frac{१}{१०} = ?$$

(1) ३००३०.३३३ (2) ३०.३३३३ (3) ३३०.३३३ (4) ३०३.३३३

---

155. $\frac{४.१२३ \times ४.१२३ - ५.८७७ \times ५.८७७}{४.१२३ - ५.८७७}$ = किती ?

(1) ८ (2) १० (3) ११ (4) ९

---

156. ४० ते ८० दरम्यानच्या विषम संख्यांची एकूण बेरीज किती ?

(1) १००० (2) १४०० (3) १२०० (4) १५००

---

157. सोडवा :

०.००५ + ०.०८ + ०.१२ = ?

(1) ०.२०५ (2) ०.२५ (3) ०.०२५ (4) ०.१२५

---

158. जर एक प्रिंटर २२ सेकंदात ६६ ओळींचे १ पान प्रिंट करत असेल तर १० पाने प्रिंट करण्यासाठी त्याला किती वेळ लागेल ?

(1) ११ मिनीटे (2) ३ मिनीटे ४० सेकंद

(3) २ मिनीटे २ सेकंद (4) २ मिनीटे २० सेकंद

---

159. एका संख्येला १०० ने भागले असता ६.४३ भागाकार (quotient) येतो जर त्या संख्येला १० ने भागले तर येणारी बाकी कोणती ?

(1) ४३ (2) ३४ (3) ६.४३ (4) ३

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

StudySite.org StudySite.org

StudySite.org StudySite.org

160. $\dfrac{\sqrt{१४४}}{\sqrt{३१+\sqrt{२२+\sqrt{५+\sqrt{१६}}}}}$ = किती ?

(1) १२ (2) ४ (3) ५ (4) २

---

161. $\sqrt[३]{\dfrac{२७}{६४}} + \sqrt{\dfrac{१}{१६}} + \square = १$

तर $\square$ च्या जागी कोणती संख्या असेल ?

(1) ० (2) १ (3) ४ (4) ३

---

162. नदीम आपल्या मासीक उत्पन्नाचे ३०% घरभाड्यावर, २०% किराणावर, १०% शिक्षणावर व ५% कपड्यावर खर्च करतो, तरीसुद्धा तो दरमहा १४३५ रु. बचत करतो. तर त्याचे मासीक उत्पन्न किती ?

(1) ५००० रु. (2) ४००० रु. (3) ४१०० रु. (4) ५२०० रु.

---

163. एक कार ६० कि.मी. प्रवास ३० कि.मी. प्रति तास वेगाने करते. पुढचे १०० कि.मी. ४० कि.मी. प्रति तास व त्यानंतरचे ४० कि.मी. ५० कि.मी. प्रति तास वेगाने करते. तर कारचा संपूर्ण प्रवासासाठीचा सरासरी वेग काढा.

(1) ४० कि.मी. प्रति तास (2) ४२ कि.मी. प्रति तास

(3) ३५.२० कि.मी. प्रति तास (4) ३७.७४ कि.मी. प्रति तास

---

164. तेवीसपेक्षा अकराने कमी असणाऱ्या संख्येची तीनपट केली असता येणारी संख्या कोणती ?

(1) ३३ (2) ३६ (3) ५८ (4) ५२

---

165. प्रशांतने ९ पुस्तके व ५ वह्या रु. ३४८ ला खरेदी केल्या. प्रत्येक पुस्तकाची किंमत रु. २७ आहे, तर वहीची प्रत्येकी किंमत किती ?

(1) २२ (2) १७ (3) १५ (4) २१

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

StudySite.org StudySite.org

StudySite.org StudySite.org

166. तीन संख्यांचा गुणाकार ३८४ आहे आणि त्या संख्या १ : २ : ३ या प्रमाणात आहेत. तर त्या संख्यांची बेरीज किती येईल?

(1) २० (2) २४ (3) ३२ (4) ४०

---

167. ५ तास + ३५ मिनीटे + ३० सेंकद = किती सेंकद?

(1) २०१३० (2) २०००० (3) ३०१५० (4) ३००३०

---

168. सोडवा $१८\frac{३}{७} - १२\frac{१}{३}$

(1) $६\frac{१}{७}$ (2) $\frac{१२८}{२१}$ (3) $६\frac{४}{७}$ (4) $\frac{१२५}{२१}$

---

169. एका माणसाने ५ लाख रु. आपल्या अ, ब, क या तीन मुलांत १ : १.५ : २.५ ह्या प्रमाणात वाटले तर क ला किती रुपये मिळतील?

(1) १,५०,००० रु. (2) २,५०,००० रु. (3) ९०,००० रु. (4) ७५,००० रु.

---

170. चार मित्रांपैकी तीन मित्र प्रत्येकी ४० रु. खर्च करतात. चौथा मित्र सर्वांच्या सरासरी खर्चापेक्षा ३० रु. अधिक खर्च करतो. तर चार मित्रांचा एकूण खर्च किती?

(1) २०० रु. (2) ३०० रु. (3) ४०० रु. (4) ५०० रु.

---

171. Ten miles _____ a long way to walk.
Choose the correct form of the verb in present tense from the following.

(1) be (2) are (3) am (4) is

---

172. 'Someone has stolen my book'.
Which sentence of the following is the correct passive voice of the above.

(1) My book has stolen by someone.
(2) My book has been stolen by someone.
(3) My book have been stolen someone.
(4) My book have stolen by someone.

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

StudySite.org StudySite.org

StudySite.org StudySite.org

173. There is a word spelt in four different ways. Out of them one is correct. Which one is correct ?

(1) Wollen (2) Wollan (3) Woolen (4) Woollen

---

174. Choose the correct spelling :

(1) begining (2) bigining (3) beginning (4) biginning

---

175. Choose the word which best expresses the meaning of 'alert' :

(1) careful (2) clever (3) thoughtful (4) watchful

---

176. Choose the appropriate form of the verb to fill in the blank.

I forget to take my medicines as soon as the time _____ .

(1) come (2) comes (3) will come (4) came

---

177. 'Though I am poor, I will not serve a Villain'.

The correct transformation of this sentence into compound sentence is :

(1) I am poor so I will not serve a villain.

(2) I am poor but I will not serve a villain.

(3) I am poor so will serve a villain.

(4) I am poor I will not serve a villain.

---

178. Change the following into indirect speech.

He says, "It is a fine day."

Choose the correct sentence from the following.

(1) He said it is a fine day. (2) He said that it was a fine day.

(3) He says that it was a fine day. (4) He says that it is a fine day.

---

179. After the word four meanings are given. Choose correct meaning from the alternatives.

Polite _____

(1) rude (2) angry (3) courteous (4) happy

P.T.O.

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

StudySite.org StudySite.org

StudySite.org StudySite.org

180. There is a word spelt in four different ways. Out of them only one is correct. Which one is correct ?

(1) maintainance (2) maintenance (3) meintenance (4) maintenence

---

181. 'Mother held the baby _____'.

Choose the correct alternative from the following.

(1) arms folded (2) within arm's reach

(3) in her arms (4) arms akimbo

---

182. Choose the correct sentence.

(1) Hardly we entered the house, when the phone started ringing.

(2) Hardly had we entered the house, when the phone started ringing.

(3) Hardly had we entered the house, than the phone started ringing.

(4) Hardly when we entered the house, the phone started ringing.

---

183. Which of the following alternatives is the correct passive form of the following sentence ?

They were carrying the injured player off the field.

(1) The injured player carried them off the field.

(2) They were carried off the field by them.

(3) The injured player was carried off by them.

(4) The injured player was being carried off the field by them.

---

184. Choose the correct sentence.

(1) As soon as the officer gave the order, the soldiers fire their guns.

(2) As soon as the officer gives the order, the soldiers fired their guns.

(3) As soon as the officer gave the order, the soldiers fired their guns.

(4) As soon as the officer gave the order, the soldiers will fire their guns.

---

185. There is a word spelt in four different ways. Out of them only one is correct. Which one is correct ?

(1) belive (2) bilive (3) believe (4) bilieve

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

StudySite.org StudySite.org

StudySite.org StudySite.org

186. The boy was disobedient and so the teacher punished him.
This sentence can be transformed into a simple sentence as :
(1) The teacher punished him because the boy was disobedient.
(2) The teacher punished the boy for disobedience.
(3) The boy disobeyed, so the teacher punished him.
(4) The teacher punished, as the boy was disobedient.

187. Choose the correct sentence.
(1) I know that you being forty on your last birthday.
(2) I know that you are forty on your last birthday.
(3) I know that you were forty on your last birthday.
(4) I know that you have been forty on your last birthday.

188. 'Some birds leave their abodes in winter and go to another place where the weather is warm.' Here 'abodes' mean _____ .
(1) fields (2) factories (3) cities (4) living places

189. Choose the correct preposition to fill in the blank.
Cut this apple _____ four pieces.
(1) in (2) with (3) for (4) into

190. 'You have got a new shirt.'
The correct question tag of this sentence is _____ .
(1) hasn't you ? (2) doesn't you ?
(3) don't you ? (4) haven't you ?

191. By the time I reach home, mother _____ cooking.
Choose the correct alternative from the following to fill in the blank.
(1) will finish (2) will be finishing
(3) will have finished (4) have finished

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

StudySite.org StudySite.org

StudySite.org StudySite.org

192. Choose the appropriate preposition to fill in the blank.
There is a bridge _____ the river.
(1) on (2) over (3) to (4) above

---

193. Choose the correct sentence which is indirect narration of the following sentence.
She said to her brother, "Please help me with my home work."
(1) She requested her brother to help him with his home work.
(2) She requested her brother to help her with her home work.
(3) She ordered her brother to help her with her home work.
(4) She commanded her brother to help her with her home work.

---

194. Choose the correct article to be filled in the space provided.
We have two Mr. Smith. Which do you want ? I want _____ Mr. Smith who signed this letter.
(1) this (2) an
(3) a (4) the

---

195. What _____ unlucky man he is !
(1) a (2) an (3) the (4) no article

---

196. There is a word spelt in four different ways. Out of them only one is correct. Which one is correct ?
(1) Calendar (2) Calender (3) Calendre (4) Calander

---

197. The birds have _____ to the South.
Choose the correct verb form from the following alternatives to fill in the blank.
(1) flew (2) flow (3) fly (4) flown

---

198. There is a correct use of preposition in one of the following sentence. Which one is correct ?
(1) I spoke to her in the telephone.
(2) I spoke to her on the telephone.
(3) I spoke to her by the telephone.
(4) I spoke to her from the telephone.

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

StudySite.org StudySite.org

StudySite.org StudySite.org

199. Which is the correct indirect form of the following direct speech ?

'Don't swim out too far, boys', I said.

(1) I warned the boys not to swim out too far.

(2) I warned, boys, don't swim out too far.

(3) I told not to swim out too far, boys.

(4) I warned boys not to swim out too far.

---

200. 'Lead is the heaviest of all metals.'

Choose the correct form of comparative degree of the above sentence.

(1) Lead is heavy than all other metals.

(2) Lead is as heavy as any other metals.

(3) Lead is heavier than all other metals.

(4) Lead is not heavier of all other metals.

- o 0 o -

StudySite.org

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

StudySite.org StudySite.org

StudySite.org StudySite.org

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

SEAL

StudySite.org

StudySite.org StudySite.org